दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २०५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.०७ मार्च २०२५




## घाटकोपरची भाषा गुजराती म्हणणा-या भय्याजी जोशींची सारवासारव

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, मुंबई :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते व माजी सरकार्यवाह भय्याजी जोशी यांनी मराठी भाषेबद्दल केलेले वक्तव्य सध्या चांगलेच चर्चेत आले आहे. मुंबईतील एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी केलेल्या वक्तव्याचे राज्याच्या राजकीय वर्तुळात पडसाद उमटल्याचे पाहायला मिळाले आहे. या मुद्द्यावर विरोधी पक्षांकडून जोरदार टीका केली जात आहे. यादरम्यान भय्याजी जोशी यांनी त्यांच्या विधानाबद्दल स्पष्टीकरण दिले असून त्यांच्या वक्तव्याबद्दल गैरसमज झाल्याची भावना व्यक्त केली आहे. यावेळी त्यांनी आपण देखील मराठी भाषिक असल्याचे स्पष्ट केले आहे.




एएनआय या वृत्तसंस्थेशी बोलताना भय्याजी जोशी यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ते म्हणाले की, मुंबईतील उपनगर घाटकोपर येथे काल एका कार्यक्रमात मी केलेल्या एका वक्तव्याबद्दल गैरसमज झाला आहे असे मला वाटते. हा प्रश्नच उपस्थित होत नाही की मुंबईची भाषा मराठी आहे की नाही. महाराष्ट्राची भाषा मराठी आहे, मुंबई महाराष्ट्रात आहे आणि स्वाभाविकपणे मुंबईची भाषा मराठी आहे.

भारतात अशा वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात, भारत यासाठी विशेष आहे. मुंबईत देखील विविध भाषिक लोक राहतात. त्यामुळे अपेक्षा असते की त्यांनी देखील येथे येऊन मराठी शिकावी, मराठी समजून घ्यावी, मराठी शिकावी. याचा आग्रह राहिलाच पाहिजे. कारण प्रत्येक राज्याची ही वेगळी ओळख आहे. हे एक सह-अस्तित्वाचे खूप मोठे उदाहरण आहे की, भारतात इतक्या विविध भाषा बोलणारे लोक एकत्र राहून परस्पर सहयोग करतात. मला वाटते की मुंबई देखील याचे आदर्श उदाहरण आहे, असेही भय्याजी जोशी यावेळी म्हणाले.

**मी स्वतः मराठी...!**

मी स्वत: मराठी भाषिक आहे. माझी मातृभाषा मराठी आहे. मराठीबद्दलचा स्वाभिमान माझ्या मनात देखील आहे. पण मी सर्व भाषांच्या अस्तित्वाचा देखील सन्मान करतो. संपूर्ण जगात देखील भारताने एक वेगळे उदाहरण सादर केले आहे. आपण त्याकडे त्याच नजरेने पाहावे अशी माझी सर्वांना विनंती आहे, असेही जोशी म्हणाले.

**भय्याजी जोशी काय म्हणाले होते?**

मुंबईची कुठलीही एक भाषा नाही, मुंबईच्या अनेक भाषा आहेत. वेगवेगळ्या भागात वेगवेगळी भाषा असते. जशी घाटकोपर परिसराची भाषा गुजराती आहे. त्याचप्रमाणे तुम्हाला गिरगावात हिंदी बोलणारे कमी सापडतील. तिथे तुम्हाला मराठी भाषा बोलणारे लोक दिसतील. मुंबईत येणाऱ्या व्यक्तीने मराठी शिकलं पाहिजे असं काही नाही, असे विधान मुंबतील विद्याविहार येथे भाषण करताना भय्याजी जोशी यांनी केले होते.

## थोडक्यात

### भंगार खरेदी टोळ्यांची दहशत

**दि.०६, नवी मुंबई :** नवी मुंबईलगत असणाऱ्या औद्योगिक वसाहतीमधील हजारो कंपन्यांतून टनांवारी निघणारे भंगार खरेदी करणाऱ्यांची दादागिरी पूर्वीपासून सुरू आहे. आता ही प्रकरणे पोलीस ठाण्यापर्यंत पोहचत आहेत. आठवडाभरात दोन गुन्हे दाखल झाले आहेत. त्यामुळे भंगार खरेदी विक्री टोळ्यांची दहशत, त्यातून गुन्हेगारी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

औद्योगिक वसाहतीत साडेतीन चार हजाराच्या घरात लहान-मोठे कारखाने आहेत. त्यातील अनेक कारखान्यांतून ठरावीक दिवसांनी टाकाऊ माल अर्थात भंगार मोठ्या प्रमाणात निघते. भंगार खरेदी विक्रीची वर्षाला कोट्यवधींची उलाढाल होत असते. यात अनेक वर्षांपासून गुन्हेगारी प्रवृत्ती व्यक्तींनी प्रवेश केला आहे. २४ फेब्रुवारीला ओरिएंटेल विविंड अँड प्रोसेसिंग कंपनीत भंगार खरेदी वरून राडा झाला होता. या कंपनीतील भंगार साहित्य एस. के. एंटरप्राइज नावाच्या भंगार खरेदी करणाऱ्या कंपनीला विकले. हे भंगार ट्रकमध्ये भरून बाहेर नेले जात असताना रुपेश आणि अनिल यांनी काही साथीदारांच्या मदतीने हे ट्रक रोखले. शेवटी एस. के. एंटरप्राइजचे कमाल खान यांच्याकडून साडे नऊ हजार रुपये जबरदस्तीने घेतल्यावर सर्व संशयित निघून गेले. या प्रकरणी तुर्भे एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा नोंद झाला होता. हे प्रकरण ताजे असतानाच सोमवारी असाच प्रकार घडला. महापे येथील भूखंड क्रमांक ३५२ येथे एक कंपनी असून व्यवसायाने माथाडी कामगार असलेले सूरज शेवाळे हे साथीदारांसह तेथे आले. त्यांनी भंगार सामान दुसऱ्याला का देतात असा जाब विचारला. याचे पर्यवसान हाणामारीत झाले. या प्रकरणी रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सुप्यातील उद्योजकांना पालकमंत्र्यांचा त्रास खासदार लंके यांचा आरोप; पंतप्रधान व मुख्यमंत्र्यांना पत्र

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, अहिल्यानगर :** सुपा औद्योगिक वसाहतीमधील उद्योजकांना वेठीस धरून पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याकडून नाहक त्रास देण्यात येत असल्याचा आरोप खासदार नीलेश लंके यांनी केला आहे. यासंदर्भात आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री व केंद्रीय उद्योग मंत्री पियुष गोयल यांच्याकडे तक्रार केल्याचे खासदार लंके यांनी सांगितले. खासदार लंके यांनी पत्रात म्हटले की, सुपा औद्योगिक वसाहत दिवसेंदिवस वाढत असून नवनवीन उद्योग येत आहेत. सध्याच्या उद्योजकांना नाहक त्रास दिला जात आहे. या त्रासामुळे या वसाहतीमध्ये नव्याने येणाऱ्या उद्योगांवर परिणाम होणार आहे आणि हे असेच सुरू राहिले तर रोजगाराच्या संधींवर त्याचा गंभीर परिणाम होईल.



स्थानिक कामगार कंत्राटदारांचे परवाने कोणतेही ठोस करण न देता रद्द करण्यात आले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेले उद्योग तसेच नव्या उद्योजकांना विनाकारण चुकीच्या नोटीस पाठवून दबाव टाकण्यात येत आहे. या औद्योगिक वसाहतीत कोणत्याही प्रकारचे गौण खनिज उत्खनन अनधिकृतपणे सुरू नसतानाही पालकमंत्री महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना उद्योजकांवर चुकीच्या पध्दतीने कारवाई करण्यासाठी करण्यास भाग पाडत आहेत. उद्योजकांना जिल्हाधिकारी कार्यालयात बोलवून धमकावले जात असल्याचा गंभीर आरोप या पत्रामध्ये खा. लंके यांनी केला आहे.

**संबंधितांना आदेश द्या !** सुपा औद्योगिक वसाहतीमध्ये जर असेच प्रकार सुरू राहिले तर सुरळीत असलेल्या व वाढत असलेल्या या औद्योगिक वसाहतीत भविष्यात नवीन उद्योग येणार नाहीत. आहेत ते उद्योग बंद होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. त्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न अधिक तीव्र होईल. याचा गांभीर्याने विचार करून संबंधितांना योग्य ते आदेश द्यावेत अशी मागणी खासदार निलेश लंके यांनी पत्राद्वारे केली आहे.

## अल्पवयीन मुलाकडून श्रीरामपूरात गोळीबार, एक जखमी, दुसरा बचावला

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, अहिल्यानगर :** श्रीरामपूर शहरातील महाविद्यालयात झालेल्या वादातून एका अल्पवयीन मुलाने सूतगिरणी- दिघी रस्त्यावर, रेल्वे गेटजवळच गावठी कट्ट्यातून दोघांवर दोन गोळ्या झाडल्या. त्यात एक जखमी झाला तर दुसरा बचावला. झाडलेली गोळी अँक्टिव्हा गाडीच्या खोपडीत घुसली. यासंदर्भात श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात अल्पवयीन मुलाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपी अल्पवयीन मुलास ताब्यात घेतले आहे.

या घटनेची फिर्यादही अल्पवयीन मुलानेच पोलिसांकडे दिली आहे. ती घटना आज गुरुवारी सायंकाळी घडली. फिर्यादी मुलाची आत्या ही अंगणवाडी (भैरवनाथनगर, श्रीरामपुर) येथे तीचे नविन घर बांधत आहे. त्या घराला पाणी मारण्यासाठी फिर्यादी, त्याचा भाऊ व अन्य एक (सर्व अल्पवयीन) हे आत्याच्या नविन घरासमोरील दिघी गावाकडे जाणा-या रस्त्यालगत थांबले होते. फिर्यादीच्या



आत्याची निळ्या रंगाची अँक्टिवा (एमएच १२ टीटी ८७५१) गाडीवर दिघी रस्त्याकडे तोंड करुन तीघे बसले असतांना फिर्यादीच्या ओळखीचा अल्पवयीन मुलगा हा समोरुन काळ्या रंगाची एफझेड मोटारसायकलवरुन आला व तो फिर्यादीच्या भावाला म्हणाला की तुच त्याचा भाऊ का? तेव्हा फिर्यादीच्या भावाला म्हणाला की हा मीच त्याचा भाऊ आहे. काही काम आहे का ? तेव्हा अल्पवयीन मुलाने महाविद्यालयात झालेल्या मागील भांडणाच्या कारणावरून शिवीगाळ करत स्वतःच्या कमरेला लपवलेली पिस्तुल बाहेर काढुन फिर्यादीच्या भावाच्या पायाच्या दिशेने गोळी झाडली. पिस्तुलातील गोळी जमीनीवर आदळून फिर्यादीच्या भावाच्या पायाला लागल्याने तो जखम झाला.

त्यामुळे फिर्यादी घाबरुन गाडीवरुन उतरुन पळाला. त्यानंतर फिर्यादीच्या दिशेने त्या अल्पवयीन मुलाने दुसरी गोळी झाडली. परंतौ फिर्यादीने ती गोळी हुकवली, तीच गोळी फिर्यादीच्या गाडीच्या खोपडीत घुसली. आजुबाजुच्या लोकांचा आरडाओरडा ऐकुन आरोपी अल्पवयीन मुलगा हा त्याच्या मोटरसायकलवरून रेल्वेगेट, सुतगिरणीच्या दिशेने पसार झाला.

जखमी मुलास रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली असून पोलिसांनी अल्पवयीन मुलाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी अल्पवयीन मुलास ताब्यात घेतले आहे. घटनेतील फिर्यादी व त्याचा भाऊ व साथीदारासह आरोपी असे सर्वजण अल्पवयीन आहेत.

## खोटी साक्ष, खोटे पुरावे दिल्याप्रकारणी थेट फिर्यादीवर गुन्हा दाखल



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, पुणे :** पोलीस प्रशासनाला खोटी साक्ष व खोटे पुरावे देऊन फसवणूक केल्याप्रकरणी थेट न्यायालयाने फिर्यादीवर गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार प्रणील कुसाळे यांनी मे.न्यालयात अँड. रमण घोरपडे यांच्यामार्फत न्यायालयात तक्रार दाखल केली होती. त्यामध्ये, दिव्या गुंजाळ, रमेश गुंजाळ, वैशाली गुंजाळ, रितिक गुंजाळ (रा. तोरडोबाची वाडी, गोलेगाव पुणे जिल्हा ता. शिरूर) या चार लोकांनवर न्यायालयात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुंजाळ यांनी कुसाळे याच्या वर खोटे आरोप करत फौजदारी गुन्हे शिरूर पोलीसांना खोटे व बनावट पुरावे देऊन गुन्हे दाखल केले होते. घडलेल्या घटनास्थळ सदर येरवडा पोलीस ठाणे येथे गुन्हा वर्गीकरण केले असताना खोटी साक्ष खोटे पुरावे देऊन दाखल केलेला गुन्हा सिद्ध झाला. नसताना दोषारोप पत्रातून संबंधित गुन्ह्याच्या पोलिस तपास अधिकारी (ख.ज) यांनी तपासतून गुन्हा सिद्ध न झाल्याने खोटा गुन्हा म्हणून दोषारोप पत्रातुन गुन्हा वगळला होता. कुसाळे यांनी थेट न्यायालयात धाव घेवून शिरूर पोलिसांना खोटे पुरावे व खोटी माहिती देऊन खोटा गुन्हा दाखल करण्यात आला होता. शिरूर पोलीसांना देखील खोटी साक्ष पुरावे दिल्या प्रकरणी युक्तिवाद वकिलानी कोर्टासमोर पक्षकाराची बाजू मांडली होती. गुंजाळ यांच्यावरती गुन्हा दाखल करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

**गुन्हा नोंद झाला असून समजपत्र बजावणीचे न्यायालयाचा आदेश**

जाणूनबुजून पोलीसांना खोटी साक्ष व खोटे पुरावे दिले असता असा युक्तिवाद अँड. रमण घोरपडे यांनी केले. ग्राह्य धरुन न्यायालयाने गुन्हा नोंद करून गुंजाळ यांना समजपत्र बजावणीचे आदेश मे . न्यायालय - न.स.बारी साहेबांनी दिले आहे.

तसेच येरवडा पोलीसांना देखील रात्र अप-रात्री आरोपी रमेश गुंजाळ यांनी येरवडा पोलीसांना फोन करून पैसे, सोनेनाणे जागा देतो, माझी ओळख खूप आहे मी शिरूर गावाचा सरपंच आहे. तुम्हाला मंत्री लोकांचे फोन येतील असे चक्क पोलीसांनाच लाजेचा आमिष देण्याचा प्रयत्न करत राजकीय दवाब दिल्याचा आरोप पोलीसांनी दोषारोपतत्रात उल्लेख केला आहे.

## कल्याण मनपा हद्दीत रिक्षा चोरांचा सुळसुळाट....

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०६,कल्याण(ठाणे) :** कल्याण डोंबिवलीमध्ये गुन्हेगारी वाढत जात चालली असून चोरांचा सुळसुळाट वाढला आहे. याच पार्श्वभूमीवर कोळसेवाडी पोलिसांनी एका सराईत चोरट्याला ताब्यात घेतलं आहे. राजेंद्र जाधव असे चोरट्याचं नाव असून तो डोंबिवली येथे राहणारा आहे. राजेंद्र कल्याण डोंबिवलीत रिक्षा चोरून कर्जत परिसरात विकत होता. राजेश जाधव विरोधात या आधी देखील डोंबिवली ,मानपाडा, कोळशेवाडी पोलीस ठाण्यात रिक्षा चोरीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली .राजेश कडून चोरी केलेल्या चार रिक्षा कोळसेवाडी पोलिसांनी जप्त केल्या आहेत. कल्याण पूर्व परिसरात गेल्या काही दिवसांपासून रिक्षा चोरीच्या घटना वाढत होत्या. या पार्श्वभूमीवर डीसीपी अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली कोळशेवाडी पोलिसांचे पथक या चोरट्यांचा शोध घेत होते.

या दरम्यान रिक्षा चोरी करणारा सराईत चोरटा राजेश जाधव डोंबिवलीत राहत असल्याची माहिती मिळताच पोलीसांच्या पथकाने राजेश जाधव याला ताब्यात घेतलं . पोलीसी खाक्या दाखवताच जाधवने रिक्षा चोरीची कबुली दिली . पोलिसांनी राजेश जाधव विरोधात गुन्हा दाखल करत त्याला अटक केली आहे.

दरम्यान राजेश जाधव याच्याकडून चोरी केलेल्या चार रिक्षा पोलिसांनी हस्तगत केल्यात . राजेश कल्याण डोंबिवलीसह आजूबाजूच्या परिसरात पार्किंग मध्ये किंवा रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या रिक्षा चोरायचा आणि त्या रिक्षा कर्जत परिसरात विकत होता. राजेश जाधव विरोधात याआधी देखील डोंबिवली, मानपाडा, कोळशेवाडी परिसरात रिक्षा चोरी संदर्भात गुन्हे दाखल आहेत . त्याला याआधी देखील रिक्षा चोरीच्या गुन्ह्यात अटक झाली होती मात्र जामिनावर सुटल्यानंतर त्याने पुन्हा रिक्षा चोरी करणं सुरू केलं . राजेशने आणखी काही रिक्षा चोरी केला असल्याचा संशय पोलिसांना असून पोलीस याप्रकरणी पुढील तपास करत आहेत.

# अक्षराज

२ बुलडाणा, शुक्रवार, दि.०७ मार्च २०२५ विविधा


## संपादकीय



### भाषिक राजकारणाचे आव्हान !

पुन्हा एकदा 'त्रिभाषासूत्रा'वर राजकीय घमसान सुरू झाले आहे. तीन भाषा असाव्यात की दोन भाषा असाव्यात, अशी चर्चा सुरू असताना 'फक्त इंग्रजी' हे अघोषित धोरण दुर्दैवाने सुरूच आहे. सामान्यपणे हेच धोरण स्वीकारले पाहिजे आणि तेच प्रगल्भ मत आहे, असे मानले जाते. याहून वाईट गोष्ट म्हणजे बहुभाषिकतेकडून एकभाषिकतेकडे सुरू असलेल्या या राज्यसंस्था प्रायोजित बौद्धिक, सांस्कृतिक आणि सभ्यतेच्या ऱ्हासालाच 'आधुनिकता' असे म्हटले जात आहे.

'त्रिभाषासूत्र' हे आपले अधिकृत धोरण आहे. शालेय विद्यार्थ्यांना तीन भाषा शिकवल्या जाव्यात, असे या धोरणात म्हटले आहे. १९६८ सालच्या धोरणात ठरले होते, '' हिंदी भाषिक राज्यांमध्ये इंग्रजी, हिंदी आणि एक आधुनिक भाषा (शक्यतो दाक्षिणात्य भाषा) आणि बिगर-हिंदी भाषिक राज्यांमध्ये हिंदी, इंग्रजी आणि एक प्रादेशिक भाषा शिकवली जावी.'' दक्षिण भारतात हिंदीविरोधात उग्र आंदोलन सुरू असताना देशातील सर्व मुख्यमंत्र्यांनी एकत्र बसून ठरवलेले हे धोरण होते. सुरुवातीला १९४८-१९४९ मध्ये राधाकृष्णन आयोगाने हे सुचवले. ते पहिल्या शैक्षणिक आयोगाने-कोठारी आयोगाने स्वीकारले. त्याचा समावेश १९६० च्या आणि नंतर १९८०च्या दशकातील शैक्षणिक धोरणात केला गेला. भारतामध्ये अनेक भाषा बोलल्या जातात. तसेच भारतातील व्यक्ती आणि समूह एकाहून अधिक भाषा बोलतात. त्यामुळे भारताची बहुभाषिक ओळख टिकवण्यासाठी, बहुभाषिकत्वाला प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षण व्यवस्थेने प्रयत्नशील असले पाहिजे. त्रिभाषासूत्र ठरवताना हा तर्क वापरला गेला आहे. सृजनशीलता आणि सामाजिक सहिष्णुता, बौद्धिक प्रावीण्य, अनवट वैचारिक क्षमता, बौद्धिक लवचीकता या बाबींसाठी बहुभाषिक शिक्षण सहाय्यभूत ठरते, हे आता पुरेशा पुराव्यानिशी सिद्ध झाले आहे. त्रिभाषासूत्र हे त्यासाठीचे व्यवहार्य उत्तर आहे.

डी. पी.पट्टनायक आणि रमाकांत अग्निहोत्री यांच्यासारख्या भाषातज्ज्ञांचा आणि शिक्षणतज्ज्ञांचा समावेश असलेल्या समितीने निष्कर्ष काढला होता की, 'त्रिभाषासूत्र' हे काही भाषा शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट नाही किंवा ती मर्यादाही नाही. उलटपक्षी नव्या भाषा शिकण्यासाठी, ज्ञानाची नवी क्षितिजे शोधण्यासाठी, देशाच्या भावनिक एकात्मतेसोबत तादात्म्य होण्यासाठीची ती एक खिडकी आहे. (भारतीय भाषा शिक्षणासाठीचा 'राष्ट्रीय लक्ष्य समूहा'ने सादर केलेला निबंध, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २००५, छउएठढ) मुलांनी टप्प्याटप्प्याने तीनहून अधिक भाषा शिकाव्यात अशी शिफारस या समूहाने केली होती. त्यातून त्यांचे पहिल्या आणि दुसऱ्या भाषेचे शिक्षण अधिक चांगल्या प्रकारे होते, असे या समितीचे म्हणणे होते.

मग आता वाद काय आहे? तमिळनाडूने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे पालन केले नाही म्हणून केंद्र सरकारने 'समग्र शिक्षा योजना'अंतर्गत असलेला बराचसा निधी राज्याला दिला नाही. आपल्या पक्षाने 'त्रिभाषासूत्र' कधीच स्वीकारले नव्हते, हे सांगत तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी त्रिभाषासूत्राचा आग्रह धरणारा केंद्राचा आदेश झुगारून दिला आहे. तमिळनाडूमध्ये नेहमी तमिळ आणि इंग्रजी या दोनच भाषा शिकवल्या गेल्या. तिसरी भाषा शिकवा असे सांगणे हा अप्रत्यक्षपणे आमच्यावर हिंदी लादण्याचा प्रयत्न आहे, असा स्टॅलिन यांनी आरोप केला आहे. केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटले आहे की तमिळनाडू सरकारला संविधानातील तरतुदींचे पालन करावेच लागेल. हा वाद चिघळला जाऊ शकतो कारण एक तर याला भावनिक रंग आहे, शिवाय पुढच्या वर्षी तमिळनाडूमध्ये विधानसभा निवडणुका आहेत. त्यामुळे संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू झाले की पुन्हा यावर रणकंदन होईल अशी शक्यता आहे.

# नियम पाळा अपघात टाळा!



गेल्या दहा वर्षात देशभरात झालेल्या अपघातात १५ लाख ३० हजारांहून अधिक अधिक नागरिकांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाने ही आकडेवारी जाहीर केली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाच्या संकेत स्थळावर ही आकडेवारी उपलब्ध असून त्यानुसार सण २०१३ ते २०२३ या दहा वर्षात रस्ते अपघातात बळी पडलेल्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे.

पहिल्या स्थानावर उत्तर प्रदेश तर दुसऱ्या स्थानावर तामिळनाडू ही राज्ये आहेत. २०२० ते २०२४ या काळात राज्यातील ४५ पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत १ लाख ५९ हजार रस्ते अपघात झाले असून त्यात ७१ हजार लोकांचा मृत्यू झाला आणि लाखो लोक गंभीर जखमी झाले आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यासाठी ही आकडेवारी भूषणावह नाही. रस्ते अपघातात जर इतके लोक दरवर्षी मरण पावत असतील तर ती चिंतेची बाब आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांशी मृत्यू हे २० ते ५० या वयोगटातील आहे. याचाच अर्थ रस्ते अपघातात सर्वाधिक मृत्यू हे तरुणांचे होत आहेत. ज्या तरुणांकडे देश भावी आधारस्तंभ म्हणून पाहत असतो तेच तरुण जर असे अकाली मृत्यू पावत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. केवळ सर्वसामान्य तरुणच नाही तर देशातील अनेक महनीय व्यक्तींचा मृत्यू देखील रस्ते अपघातात झाला आहे. तीन वर्षापूर्वी शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आणि मराठा समाजाचे नेते विनायक मेटे यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठा समाजाचीच नव्हे तर राज्याची मोठी हानी झाली. त्यांच्या अपघाती निधनातून राज्य सावरत नाही तोच टाटा उद्योग समूहाचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योगपती सायरस मिस्त्री यांचे अपघाती निधन झाले. सायरस मिस्त्री यांचा गुजरातच्या अहमदाबादवरून मुंबईला जाणाऱ्या मार्गावर चारोटी जवळ सुर्या नदीच्या पुलावर अपघात झाला. सायरस मिस्त्री यांचे देशाच्या औद्योगिक विकासात महत्वाचे योगदान आहे. त्यांच्या निधनाने उद्योग विश्वात मोठी शोककळा पसरली होती. सायरस मिस्त्री, विनायक मेटे यांच्यासारख्या समाजातील महनीय व्यक्तींच्या अशा अकाली निधनाने समाजाचे मोठे नुकसान होत आहे. विनायक मेटे, सायरस मिस्त्री हे समाजातील महनीय व्यक्ती आहेत म्हणून त्यांच्या निधनाची बातमी झाली. रस्ते अपघातात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो देशात सर्वात जास्त मृत्यू रस्ते अपघातात होतात. अपघातात जखमी आणि कायमचे जायबंदी होणाऱ्यांची संख्या तर अगणित आहे. विशेष म्हणजे यात तरुणांचा समावेश अधिक आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत त्याच तरुणांचे अपघातात निधन होत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. अनेक प्रयत्न करूनही देशातील रस्ते अपघातांची संख्या का कमी होत नाही हा संशोधनाचा विषय आहे. वाढत्या रस्ते अपघातांना जितकी व्यवस्था जबाबदार आहेत तितकीच मानवी चुकाही जबाबदार आहेत. टोलच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची वसुली केली जात असतानाच महामार्गावर जीवघेण्या ब्लॅकस्पॉट मध्ये सुधारणा होत नाही. त्याचप्रमाणे रस्त्यांवरील खड्डे, धुळीचे साम्राज्य, महामार्गावरील अतिक्रमणे, सर्व्हिस रोडचा अभाव, रस्त्यावरच उभी केली जाणारी अवजड वाहने, बंद पडलेल्या वाहनांसाठी कमी पडत असलेली मदत केंद्रे, मोकाट जनावरे, अपुरे दुभाजक याबाबी अपघातांसाठी कारणीभूत ठरत आहेत. महामार्गावर वाहन चालकांकडून वेग मर्यादा पाळण्यात येत नाही. बहुतेक प्रवासी १०० किमी पेक्षा अधिक वेगाने वाहने चालवतात. ट्रक व इतर मोठ्या वाहनांकडून लेनची शिस्त पाळली जात नाही. काही वाहन चालक तर दारु पिऊन वाहने चालवतात तर काही वाहन चालक वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलतात. वाहनांची व्यवस्थित निगा न राखणे, सीट बेल्ट न लावणे या गोष्टीही अपघातास कारणीभूत ठरतात. नियम माहीत असूनही चालक त्यांचे पालन करत नाहीत. सगळ्यांनाच कमी वेळात आपले ठिकाण गाठायचे असते. नियमांचे पालन न केल्यानेच अपघातांची संख्या कमी होत नाही. अपघातांची संख्या कमी करायची असेल तर वाहन चालकांना नियमांचे पालन करावेच लागेल. नियम पाळा अपघात टाळा!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## समीर वानखेडे यांच्या बदलीवर केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाची स्थगिती

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, नवी दिल्ली :** केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या (CAT) प्रधान खंडपीठाने इंडियन रेव्हेन्यू सर्व्हिस (IRS) अधिकारी समीर वानखेडे यांच्या मुंबईहून चेन्नई येथे झालेल्या बदल्या आदेशाला रद्द ठरवले आहे. वित्त विभागाने मे २०२२ मध्ये जारी केलेला बदल्या आदेश स्वेच्छाचारी आणि त्यांच्या स्वतःच्या बदली धोरणाच्या विरोधात असल्याचे न्यायाधिकरणाने म्हटले आहे. न्यायमूर्ती रंजीत मोरे (अध्यक्ष) आणि सदस्य (प्रशासन) राजिंदर कश्यप यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, वानखेडे यांच्या संदर्भातील विभागाचा दृष्टिकोन पक्षपाती असल्याचे स्पष्ट होते.

समीर वानखेडे, २००८ बॅचचे IRS अधिकारी, २०२१ मध्ये मुंबईतील नारकोटिक्स कंट्रोल ब्युरो (NCB) च्या झोनल डायरेक्टर पदावर कार्यरत होते. त्यांनी अभिनेता शाहरुख खान यांचा मुलगा आर्यन खान याला ड्रग्ज प्रकरणात अटक केली होती. ज्यामुळे ते चर्चेत आले होते. मात्र, नंतर या प्रकरणात लाचखोरी आणि गैरव्यवहाराच्या आरोपांमुळे त्यांची चौकशी करण्यात आली. अखेरीस पुराव्याअभावी NCB ने आर्यन खानविरोधातील केस बंद केली.

यानंतर, वानखेडे यांच्यावर विभागीय चौकशी सुरू करण्यात आली. सीबीआय आणि अंमलबजावणी संचालनालयाने (ED) त्यांच्याविरोधात खंडणी आणि मनी लाँड्रिंग प्रकरणी गुन्हे दाखल केले. त्यानंतर त्यांची छउइ मधून बदली करून पुन्हा महसूल विभागात पाठवण्यात आले. ३० मे २०२२ रोजी वानखेडे यांची मुंबईतील महासंचालनालय विश्लेषण आणि धोका व्यवस्थापन (DGARM) येथून महासंचालनालय करदाता सेवा (DGTS), चेन्नई येथे बदली करण्यात आली. याबाबत विभागाने मांडले की, वानखेडे २०१० पासून मुंबईत कार्यरत होते. मात्र, न्यायाधिकरणाने स्पष्ट केले की, वानखेडे हे या कालावधीत NCB, DRI, कस्टम्स, केंद्रीय उत्पादन शुल्क यांसारख्या विविध संस्थांमध्ये प्रतिनियुक्तीवर होते. बदल्या धोरणानुसार प्रतिनियुक्तीवरील कालावधी सेवेच्या एकूण कार्यकाळातून वजा केला जातो. न्यायाधिकरणाने नमूद केले की, वानखेडे यांनी ६ वर्षे ८ महिने प्रतिनियुक्तीवर मुंबई आणि दिल्ली येथे सेवा बजावली असून, त्यामुळे त्यांची बदली विभागाच्या धोरणानुसार योग्य नाही. अधिकाऱ्याला अखिल भारतीय सेवा बंधन असले तरीही, प्रशासनाने बदल्या करताना स्वतःच्या धोरणाचे पारदर्शक आणि न्याय्य पालन करणे आवश्यक आहे, असे न्यायाधिकरणाने स्पष्ट केले. CAT ने स्पष्ट केले की, जर बदल्या मनमानी पद्धतीने आणि द्वेषापोटी केल्या जात असतील, तर त्या न्यायालयीन फेरतपासणीस पात्र ठरतात. २०१८ च्या खठड (CCE) अधिकाऱ्यांसाठीच्या नवीन बदल्या/नियुक्ती मार्गदर्शक तत्त्वांनुसार ही बदली नाही, असे निरीक्षण नोंदवत CAT ने हा आदेश रद्द केला. मात्र, विभागावर दंडात्मक खर्च लावण्यापासून न्यायाधिकरणाने स्वतःला रोखले.

### सूज्ञ मराठी ..




अ पासून ज्ञ पर्यंत
गं मराठीशिकविते
अज्ञ बनवला सूज्ञ
जग सारे दाखविते

वेलांटी महत्व पूर्ण
थोरां पुढे झुकविते
वेलांटीची कोलांटी
भल्यांना वाकविते

काना जणूं कान्हा
ज्ञान भूक भागविते
उकार गळेअहंकार
ज्ञान तृषा जागविते

प्रश्न चिन्ह विचारते
मोतीकसे करी रिते
संयोग चिन्हे जोडते
शब्दा अर्थाशी नाते

अनुस्वार होई स्वार
कुंकूटिळा शोभवते
विरामचिन्हे अद्भुत
समृध्दता संभविते

मात्रा सर्वांवर मात्रा
म-हाठी सर्वांभावते
पूर्णविराम अंतीमत:
गौरव स्थाना दावते

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## प्रतिकूल परिस्थितीवर मात करणाऱ्या कर्तृत्ववान महिला...

८ मार्च हा जागतिक महिला दिन भारतात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.या दिवशी महिला सक्षमीकरणाचे अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. खाजगी व शासकीय पातळीवर जागतिक महिला दिनाचे कार्यक्रम आयोजित करून प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यशाचा झेंडा रोवणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा यथोचित असा सन्मान केला जातो.शैक्षणिक क्षेत्रात जागतिक महिला दिन अतिशय प्रभावीपणे साजरा केला जातो.सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घेऊन शैक्षणिक कार्याचा ठसा उमटविणाऱ्या शिक्षिकांच्या कार्याचा गौरव केला जातो.उद्योग, व्यापार,शेती,क्रीडा,कला,मनोरंजन, आणि इतरही क्षेत्रात अनेक कर्तृत्ववान महिला आहेत ज्यांनी आपल्या कार्याने समाजाला व स्त्रियांना सन्मानाने जीवन जगण्याचा मूलमंत्र दिला आहे. जागतिक महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान परंतु प्रसिद्धीपासून दूर राहणाऱ्या महिलांच्या कार्याचा गौरव या लेखात करण्यात आला आहे.

लातूर जिल्ह्यातील अहमदपूर हे शिक्षण क्षेत्रात नावारुपाला आलेले शहर आहे.येथे वास्तव्यास असलेल्या अनेक शिक्षिकांनी शिक्षण क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे.अहमदपूर शहरात अनेक नामांकित शाळा आहेत.पण संत ज्ञानेश्वर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आशाताई रोडगे यांनी त्यांच्या लक्षणीय अशा शैक्षणिक कार्याचा ठसा उमटवला आहे.त्यांनी त्यांची शाळा नावारुपाला आणली आहे. त्यांच्या कार्याची दखल महाराष्ट्र शासनाने घेतली व राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन त्यांचा यथोचित सन्मान केला आहे.तसेच अहमदपूर शहरातील सुप्रसिद्ध उद्योजिका आणि मैत्रिण ब्युटी पार्लरच्या संयोजिका संगिता अंकुश आढे(राठोड)यांचे कार्यही उल्लेखनीय व इतर महिलांसाठी प्रेरणादायी आहे.त्यांचा जन्म जालना जिल्ह्यातील अंबड येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कन्या शाळेत झाले आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मत्स्योदरी विद्यालयात झाले.परंतु,त्यांना लहान पणापासून कलेची आवड होती. म्हणून दहावी बोर्ड परिक्षा दिल्यावर त्यांनी मेहंदीचे क्लास केले.नंतर त्यांनी शिवणकामचे शिक्षण घेतले. बारावीचे शिक्षण शिकत फावल्या वेळात त्यांनी विनकाम,भरतकाम व ब्युटी पार्लरचा कोर्सही पूर्ण केला.बारावी उत्तीर्ण झाल्यावर संगिता ताईंनी बी.ए.ला प्रवेश घेतला.परंतु,तेव्हाच्या सामाजिक परंपरेनुसार त्यांच्या वडिलांनी त्यांचे लग्न करण्याचा निर्णय घेतला.

संगिता राठोड ह्या भगिनी लग्नानंतर अहमदपूर येथे स्थायिक झाल्या व संगिता अंकुश आढे या नावाने ओळखल्या जाऊ लागल्या. त्यांचे पती व आदर्श शिक्षक अंकुश आढे यांनी संगिता ताईंना उच्च शिक्षण चालू ठेवण्याची परवानगी दिली.मग काय अगदी मेहनतीने व चिकाटीने त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामधून बी.ए.ची पदवी मिळवली. त्यानंतर त्यांनी बी.एड्.चे शिक्षण सुध्दा यशस्वीपणे पूर्ण केले.शिक्षिका पेशाची नोकरी करण्याचा मनोदय चालू होता.पण पती पत्नी दोघांनी मिळून नोकरी केली तर मुलांचे हाल होतील, त्यांच्याकडं दूर्लक्ष होईल हे लक्षात घेऊन संगिता ताईंनी नोकरीचा विचार सोडून दिला.सुरुवातीला त्यांनी शिवणकाम सुरू केले. यावेळी त्यांनी होतकरू व गरीब महिलांना मोफत शिवणकाम शिकवून त्यांना त्यांच्या पायावर उभे केले.एवढ्यावर न थांबता संगिता ताईंनी घरामध्ये एक खुर्ची विकत घेतली आणि केवळ दीड हजार रुपयांचे साहित्य खरेदी करून ब्युटी पार्लरचा उद्योग सुरू केला.या कामी त्यांना त्यांच्या नातलगांनी व पती अंकुशराव यांनी मोलाची साथ दिली.सासू सासरे व आई वडील यांचे आशीर्वाद सोबत होते.एका खोलीत आणि एका खुर्चीत सुरू केलेला हा व्यवसाय आता विस्तारला आहे. अहमदपूर शहरात व आसपासच्या नांदेड, परभणी व बीड जिल्ह्यातील अनेक गावांच्या महिला संगिता ताईंच्या मैत्रिण ब्युटी पार्लर मध्ये येतात. ताईंचा आपुलकीचा स्वभाव, महिलांशी संवाद साधण्याची कला व उत्कृष्ट पार्लर सेवा यामुळे एक नामांकित उद्योजिका म्हणून त्या ओळखल्या जातात.गरीबांच्या मुलींच्या लग्नाचा मेकअप त्या अगदी कमी पैशातही करतात. होतकरू व आर्थिक परिस्थिती नाजूक असणाऱ्या मुलींना त्यांनी ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण मोफत दिले आहे. आणि आज त्यांच्या काही शिष्या त्यांच्या दुकानात जॉब करतात.संगिता ताईंनी नोकरी पेक्षा

स्वतःची आवडनिवड जपली, नोकरी पेक्षा लघु उद्योग सुरू केला. आज त्याचे वटवृक्षात रुपांतर झाले आहे.जागतिक महिला दिनानिमित्त त्यांना खूप खूप शुभेच्छा. त्यांच्या कार्याला सलाम!

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर.मो.९५४५४४२६४८**


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## ८ मार्चला स्वच्छतेचा संदेश प्रसारित करीत धावणार महिला मिनी मॅरेथॉन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०६, नवी मुंबई :** स्वच्छ शहराचा बहुमान वाढविण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेस विविध संस्थांचेही महत्वपूर्ण योगदान लाभत असते. अशाच प्रकारचा 'रन फॉर क्लिन नवी मुंबई (चला धावूया स्वच्छ नवी मुंबईसाठी)' हा एक अभिनव उपक्रम जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ८ मार्च रोजी नवी मुंबई महानगरपालिकेच्या सहयोगाने डॉ. डि. वाय. पाटील डिम्ड टू बी युनिव्हर्सिटी ऑफ हॉस्पिटॅलिटी अँण्ड टुरिजम स्टडिज यांच्या वतीने 'घे भरारी' शिर्षकांतर्गत राबविण्यात येत आहे.

८ मार्च २०२५ रोजी, सकाळी ६.३० वाजता, सायन पनवेल महामार्गा नजिकच्या सर्विस रोड वर असलेल्या डॉ. डि. वाय. पाटील स्टेडियमच्या मुख्य प्रवेशद्वारापासून या महिला मिनी मॅरेथॉनला प्रारंभ होणार असून ५ कि.मी. अंतराच्या या मिनी मॅरेथॉनमध्ये विविध वयोगटातील महिला सहभागी होऊ शकतात. स्वच्छतेचा संदेश प्रसारित करीत धावणारी ही मिनी मॅरेथॉन धावण्याचे महत्व अधोरेखित करीत आरोग्यपूर्ण जीवनाची गरजही सांगणार आहे. या महिला मिनी मॅरेथॉनद्वारे स्त्री सक्षमीकरणाचा गौरव केला जाणार असून त्यासोबतच स्वच्छ व हरित नवी मुंबईला चालना मिळणार आहे. घरापासूनच कचरा वर्गीकरणातून अधिक शाश्वत व सर्व समावेशक भविष्याकडे वाटचाल करताना स्वच्छतेचा संदेश जनमानसात रुजविणारी ही मॅरेथॉन असणार आहे. घे भरारी या महिला मिनी मॅरेथॉनमध्य सहभागा साठी नाव नोंदणी करणे आवश्यक असून अधिक माहितीसाठी ८०९७१०९२४१ / ८३६९२७५६६७ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

## नाशिक नगरपालिका आयुक्तांकडून अग्निशमन दलाचा सन्मान



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०६, विंचूर (नाशिक) :** नाशिक येथील महानगरपालिका आयुक्त कार्यालयात सन्माननीय नगरपालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी नाशिक अग्निशमन दलाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा विशेष कामगिरी केल्याबद्दल सन्मान केला. डी.एम फर्निचर इंदिरानगर जॉगिंग ट्रॅक जवळ येथे आग लागली होती. तेथील कमीत-कमी वेळेत घटनास्थळी पोहोचून उत्कृष्टरित्या परिस्थिती हाताळून कमी कर्मचाऱ्यांमध्ये अत्यंत चांगली कामगिरी करून आग लवकरात-लवकर नियंत्रणात आणल्याबद्दल मनीषा खत्री आयुक्त नाशिक महानगरपालिका यांनी व अतिरिक्त आयुक्त झगडे यांच्या उपस्थितीत मुख्य अग्निशमन दलाचे अधिकारी संजय बैरागी, प्रभारी केंद्रप्रमुख, लिडिंग फायरमन, वाहन चालक, ट्रेनी फायरमन, कॉन्ट्रॅक्ट वरील वाहन चालक या सर्वांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. व त्यांच्या कामगिरीबद्दलची दखल घेऊन आनंद व्यक्त केला.

## आ.पाटील यांच्या प्रयत्नाने आष्टी उपसा सिंचन योजनेतून मोडनिंब शहराला मिळाले पाणी



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०६, पंढरपूर :** माढा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार अभिजीत पाटील यांच्याकडे मोडनिंब शहरातील अनेक ग्रामस्थांनी मागणी केली असता केली कित्येक वर्षापासून प्रलंबित असलेल्या मोडनिंब शहराला पाणी प्रश्नाला अखेर न्याय मिळाला असल्याने नागरिकामध्ये आनंदाचे वातावरण झाले आहे. मोडनिंब शहर आणि परिसरातील नागरिकांची पाण्यासाठीची प्रतीक्षा अखेर संपली असून आमदार अभिजीत पाटील यांच्या माध्यमातून पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांशी सातत्याने चर्चा आणि पाठपुरावा केल्यानंतर आष्टी उपसा सिंचन योजनेतून डाव्या कालव्यातून पहिल्यांदाच पाणी सोडण्यात आले. या ऐतिहासिक क्षणी जिल्हा परिषद सदस्यभारत आबा शिंदे, आनंद पाटील, डॉ. सागर गिड्डे, बाळासाहेब पाटील, बालाजी पाटील, शिवाजीराजे सुर्वे, दिपक सुर्वे, गौतम ओहोळ, गोटु शिंदे, विजयसिंह गिड्डे, संतोष मुटकुळे, संभाजी काळे, अख्तरभाई तांबोळी, आकाश कोळी, संभाजी लादे, नंदकुमार लादे, प्रकाश कोळी, संचालक संदीप खारे, सचिन वाघाटे यांनी जलपूजन करून आनंद व्यक्त करत आमदार पाटील यांचे आभार व्यक्त केले. मोडनिंबसाठी हा विकासाचा महत्त्वाचा टप्पा असून भविष्यात आणखी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार असे देखील आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले आहे.

## ठाणे आरटीओ कार्यालयाबाहेर आंदोलन




**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.०६, ठाणे :** हाय रजिस्ट्रेशन नंबर प्लेटच्या विरोधात धर्मराज्य पक्षाचे ठाणे आरटीओ कार्यालयाबाहेर आंदोलन राजन राजे यांच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या आदेशानुसार महाराष्ट्र शासनाने राज्यातील वर्ष २०१९ पूर्वी खरेदी केलेल्या जुन्या वाहनांना अद्यायुनिक अशी उच्च सुरक्षा असणारी हायसेक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट ३० एप्रिल २०२५ पर्यंत बसवण्याचे निर्णय घेतले आहेत. तरी राज्य सरकारकडून ३ कंपन्यांना वाढीव दराने टेंडर देण्यात आले आहेत. मात्र भारतातील इतर राज्यातील दर आणि महाराष्ट्रातील दर यामध्ये मोठा फरक आहे. त्याच विरोधामध्ये धर्मराज्य पक्षाच्यावतीने आज ठाणे आरटीओ कार्यालया बाहेर मोठे आंदोलन करण्यात आले आहे. बाजूच्या राज्यात गोव्यामध्ये १५५ तर गुजरात मध्ये १६० आणि महाराष्ट्रामध्ये ४५५ आहे. टू व्हीलर असो या थ्री व्हीलर रिक्षा असो महाराष्ट्रामध्ये अशी लूट का ? रिक्षावाले १० ते १२ तास रिक्षा चालवतात त्यांचं हातावरचे पोट आहे. मुलांचे शिक्षण आहे.आधीच इन्शुरन्स बाटला पासिंग यामध्ये त्यांची फसवणूक होते. हे सगळं थांबवावं जे टेंडर काढले आहे ते तत्काळ थांबवावं आणि जे बाजूच्या राज्यात लावलेले रेट आहेत. ते महाराष्ट्रात लागू करावे. अशी मागणी धर्मराज्य पक्षाच्यावतीने आंदोलनात करण्यात आली.

# कल्याणमध्ये रिक्षा चोरीच्या ४ गुन्ह्यांचा पर्दाफाश



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०६, कल्याण :** कोळसेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सतत घडणाऱ्या वाहन चोरीच्या गुन्ह्यांवर आळा घालण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक कार्यरत होते.

या तपासाअंती वाहन चोरी करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला अटक करत, चोरीस गेलेल्या ४ रिक्षा हस्तगत करण्यात पोलीसांना यश आले आहे. पोलीस उप आयुक्त (परिमंडळ ३) अतुल झेंडे यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाला वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी निर्देश दिले होते.

यानुसार, गुप्त माहिती आणि सापळ्याच्या आधारे संशयित आरोपी राजेंद्र आजीनाथ जाधव (वय ४२, रा. कोळेगाव, पाईपलाईन रोड, डोंबिवली पूर्व) याला १०० फुटी रोड, कल्याण पूर्व येथे संशयास्पद स्थितीत फिरताना अटक करण्यात आले.

प्राथमिक चौकशीत त्याने कोळसेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरी केलेल्या एका रिक्षाची कबुली दिली. त्याच्या माहितीच्या आधारे चोरीस गेलेली रिक्षा (चक ०५ इक्र ९१२९) हस्तगत करण्यात आली. पुढील तपासात त्याने यापूर्वीही कल्याण शहरातून तीन रिक्षा चोरी केल्याचे मान्य केले. त्याने या रिक्षा कर्जत, जिल्हा अहिल्यानगर येथे लपवून ठेवल्या असल्याची माहिती दिली.

पोलीसांनी त्वरित तेथे जाऊन उर्वरित तीन रिक्षा देखील जप्त केल्या.

१) गुन्हा क्र. २०६/२०२५ – कोळसेवाडी पो.स्टे. कलम: ३०३(२) भा.दं.वि. जप्त रिक्षा क्रमांक: चक ०५ इक्र९१२९ किंमत: ₹६०,०००

२) गुन्हा क्र. १०४/२०२५ – कोळसेवाडी पो.स्टे. कलम: ३०३(२) भा.दं.वि. जप्त रिक्षा क्रमांक: चक ०५ उक्र ०८३१ किंमत: ₹४५,०००

३) गुन्हा क्र. १५०/२०२५ – कोळसेवाडी पो.स्टे. कलम: ३०३(२) भा.दं.वि. जप्त रिक्षा क्रमांक: चक०५ ट ०९१९ किंमत: ₹५५,०००

४) गुन्हा क्र. १८५/२०२५ – बाजारपेठ पो.स्टे. कलम: ३०३(२) भा.दं.वि. जप्त रिक्षा क्रमांक: चक ०५ उक्र १०४५ किंमत: ₹३०,०००

आरोपीकडून चार रिक्षा जप्त करण्यात आल्या असून त्यांची एकूण किंमत ₹१,९०,००० एवढी आहे.ही यशस्वी कारवाई अपर पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण) संजय जाधव, पोलीस उप आयुक्त (परिमंडळ ३, कल्याण) अतुल झेंडे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त (कल्याण विभाग) कल्याणजी घेटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

सदर प्रकरणात कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश न्हायदे, पोलीस निरीक्षक (प्रशासन) साबाजी नाईक, सहाय्यक पोलीस निरीक्षक दर्शन पाटील आणि संदिप भालेराव यांच्या नेतृत्वाखालील पथकाने उत्कृष्ट कामगिरी बजावली. तसेच पोलीस अंमलदार सचिन कदम, विशाल वाघ, भगवान सांगळे, गोरक्षनाथ घुगे, विकास भामरे, सुरेंद्र इंगळे यांनी या कारवाईत महत्त्वाची भूमिका बजावली. या यशस्वी तपासामुळे वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यात यश आले असून कल्याण परिसरातील नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

# जिल्ह्यातील सर्व आधार केंद्र तपासणीचे आदेश

## आ.जगताप यांची तक्रार; गैरप्रकारांमुळे ३० सेतू केंद्र बंद



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, अहिल्यानगर :** राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) आमदार संग्राम जगताप यांनी केलेल्या तक्रारीनंतर जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व आधार केंद्र व सेतु केंद्रांच्या (आपले सरकार सेवा केंद्र) तपासणीचे आदेश दिले आहेत. दरम्यान, मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमात यापूर्वी सुरू करण्यात आलेल्या तपासणी मोहिमेत आतापर्यंत एकूण ३० सेतु केंद्रांवर विविध कारणांनी कारवाई करून ते बंद करण्यात आले आहेत. जिल्ह्यात एकूण २०६ आधार केंद्रे आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयासह जिल्हा परिषद, बीएसएनएल यांच्यामार्फत त्यांना कीट देण्यात आले आहेत, तर सेतु केंद्रांची संख्या २१०६ आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासह ग्राम पंचायत, महाविद्यालयामार्फत त्यावर नियंत्रण ठेवले जाते. मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत आधार केंद्र व सेतु केंद्रांची तपासणी सुरू करण्यात आली आहे.

गेल्या ३ महिन्यांत ३० सेतु केंद्रांवर विविध कारणांनी कारवाई करत गैरप्रकार आढळल्याने ते बंद करण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली. ही मोहीम अद्याप सुरूच आहे. दरम्यान, आमदार संग्राम जगताप यांच्यासह १३ जणांनी बांगलादेशी घुसखोरांना (रोहिंगे) कागदोपत्री आश्रय देणाऱ्या आधार केंद्रचालकांवर कारवाईची मागणी करण्यात आली होती.

या मागणीनुसार जिल्हाधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत, नगर परिषद, नगर पंचायत, महापालिका, तहसीलदार, उपविभागीय कार्यालय, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र देत जिल्ह्यातील सर्व केंद्रांची तपासणी करण्याचा आदेश दिला आहे. बांगलादेशी घुसखोरांना सेतू चालक यामार्फत आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदार कार्ड, वाहन चालवण्याचा परवाना अशी कागदपत्रे बेकायदारीत्या काढून देण्यात येत असल्याची तक्रार असल्याने त्या अनुषंगाने तपासणी करून स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर करण्याचा आदेश देण्यात आला आहे. गैरप्रकार करणारे आधार केंद्रचालक आढळून आल्यास संबंधितांचे केंद्र बंद करण्याची कारवाई प्रस्तावित करावी, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# पंढरपूर तालुका पोलिसांची मोठी कारवाई

## १४७ किलो गांजासह ४० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०६, पंढरपूर :** पंढरपूर येथील अहिल्यादेवी चौकात दिनांक ०५ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे गुरसाळे रोडवर अहिल्यादेवी चौकात उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर यांना मिळालेल्या गोपनीय बातमीच्या आधारे पंढरपूर तालुका पोलिसांनी अहिल्यादेवी चौकात नाकाबंदी करण्यात आली होती.

सदर नाकाबंदी कारवाईच्या वेळेस गुरसाळे येथून अहिल्यादेवी चौकात एक संशयित महिंद्रा एक्स वि फाईव्ह हंड्रेड कार जाताना पंढरपूर तालुका पोलिसांनी अडवून संशयित वाहनाची तपासणी केली असता सदर वाहनांमध्ये इसम नामे प्रदीप दत्तात्रय हिवरे वय २० वर्षे राहणार पुरंडवडे माळशिरस तालुका जिल्हा सोलापूर याच्याकडे विचारपूस केली. सदर कारमध्ये मधल्या सीटवर पाठीमागच्या सीटवर एकूण ३ पोते गांजा आंबट उग्र वासाचा एकूण ७२ पाकिटामध्ये पॅक करण्यात आला होता.

सदर गांजा जागीच शासकीय पंचांच्या उपस्थित वजन केला असता एकूण १४७ किलो ग्रॅम वजनाचा गांजा व महिंद्रा xuv५०० तिचा नंबर mh १२ एच व्ही ५६ ६६ कार एकूण ४० लाख रुपयांचा मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त केलेला आहे. सदर गाडीतील इसम प्रदीप दत्तात्रय हिवरे वय २० वर्षे राहणार पुरंदवडे माळशिरस याचे व त्याचे ३ साथीदार नामे गणेश हनुमंत पवार गणेश हनुमंत पवार राहणार जिंपुरी तालुका माळशिरस राहणार चिंचपुरी तालुका माळशिरस प्रमोद उर्फ सोनू मुळीक राहणार गुरसाळे तालुका माळशिरस यांच्याविरुद्ध पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे एनडीपीएस NDPS ॲक्ट कलम नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पंढरपूर तालुका पोलिसांची ही अवैध गांजाविरुद्ध आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई करण्यात आलेली असून एकूण १४७ किलो इतका गांजा व कार असा चाळीस लाखाचा मुद्देमान पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त केला आहे. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय मुजावर, पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक घोडके, पीएसआय विक्रम शेठ वडणे, पीएसआय भारत भोसले, पीएसआय घुंगुरकर, पीएसआय पिसाळ, सहाय्यक फौजदारविजू गायकवाड, सहायक फौजदार दत्तात्रय तोंडले, साह फौजदार शरद कदम, पोलीस हवालदार विनायक क्षीरसागर, पोलीस कॉन्स्टेबल अमोल गावडे, सुजित उबाळे, पोलीस हवालदार मंगेश रोकडे, पोलीस कॉन्स्टेबल रामकृष्ण खेडकर, सह फौजदार शरद कदम, पोलीस हवालदार सूरज हेंबाडे, सचिन हेंबाडे, पोलीस हवालदार प्रसाद आवटी, पोलीस कॉन्स्टेबल समाधान माने, पोलीस कॉन्स्टेबल शहाजी मंडले यांच्या पथकाने केली आहे.

# शाळा, अंगणवाडीतील मुलामुलींच्या आरोग्य तपासणीला सुरुवात

## ३३ आरोग्य पथक नियुक्त; तालुकानिहाय दररोज गावभेटी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, बुलडाणा :** सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागामार्फत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत १ मार्चपासून जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय शाळा आणि अंगणवाडीतील ० ते १८ वयोगटातील मुलामुलींची आरोग्य तपासणी केली जात आहे.

या कार्यक्रमांतर्गत ३३ आरोग्य पथकाकडून तालुकानिहाय गावांमध्ये जावून मुलामुलींची दररोज आरोग्य तपासणी केली जात आहे.

यात बुलढाणा ४, मेहकर ३, लोणार २, देऊळगाव राजा २, मोताळा २, नांदुरा २, जळगांव जामोद २, शेगाव २, संग्रामपूर २, मलकापूर २, सिंदखेडराजा २ खामगाव ४ आणि चिखली तालुक्यासाठी ४ आरोग्य पथक नेमण्यात आले आहेत.

# पनवेल मनपा च्या वतीने महिला दिनानिमित्त हिरकणी महोत्सवाचे भव्य आयोजन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०४, पनवेल :** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने पनवेल महानगरपालिकेतर्फे शुक्रवार, दिनांक ७ मार्च रोजी पनवेल मनपा हद्दीतील महिलांसाठी भव्य दिव्य अशा 'हिरकणी महोत्सव' - सन्मान महिलांचा या कार्यक्रमाचे आयोजन आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले आहे. सदर महोत्सव करिता प्रमुख अतिथी म्हणून राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार डॉ.मनीषा कायंदे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील यांची उपस्थिती लाभणार आहे.

विशेष आकर्षण महिलांसाठी फिटनेस फंडा सांगण्यासाठी सिने अभिनेत्री भार्गवी चिरमुले या देखील उपस्थित राहणार आहेत. दिनांक ७, ८ व ९ अशा तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात बचत गटाचे तीन दिवसांकरिता ३० स्टॉल्स असणार आहेत. दि.७ मार्च रोजी सकाळी १० वाजता बचत गटांच्या स्टॉलचे तसेच आरोग्य शिबिराचे उद्घाटन होऊन महोत्सवाची सुरुवात होणार आहे.

महिलांसाठी स्वसंरक्षणाचे प्रात्यक्षिक अलिबाग रायगड येथील स्वयंसिद्धा च्या संचालिका, राष्ट्रीय पारितोषिक विजेत्या तपस्वी गोंधळी आणि त्यांचे सहकारी सादर करणार आहेत. तसेच आजकाल होणाऱ्या सायबर फसवणुकीपासून आपला बचाव व्हावा याकरिता नवी मुंबई येथील सायबर सेलचे पोलीस निरीक्षक यांचे सायबर फसवणूक आणि त्यापासून बचाव या विषयी मार्गदर्शन होणार आहे. त्याचबरोबर सिने अभिनेत्री भार्गवी चिरमुले या महिलांसाठी फिटनेसबाबतचे मार्गदर्शन करणार आहे. तसेच त्यांची प्रगट मुलाखत देखील घेण्यात येणार आहे.

दुपारच्या सत्रामध्ये खेळ पैठणीचा - आवाज पनवेलचा हा महिलांसाठी लोकप्रिय असा कार्यक्रम सादर होईल. या कार्यक्रमात तीन विजेत्या महिलांना पैठणीची विशेष भेट देण्यात येईल. तसेच महिलांसाठी गीत, संगीत, गायन, नृत्य, 'महाराष्ट्राची लोक संस्कृती' असा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला जाईल. या कार्यक्रमात उपस्थित महिलांनाही सहभागी होता येईल.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे सदर कार्यक्रमास उपस्थित राहणाऱ्या सर्व महिलांना लॉटरी द्वारे भेटवस्तू देण्यात येतील. तसेच मतदान जनजागृती, बेटी बचाओ, बेटी पढाओ आणि आकर्षक असे फुलांचे सेल्फी पॉइंट देखील या ठिकाणी असणार आहेत. या कार्यक्रमाचा लाभ पनवेल महानगरपालिका हद्दीतील महिलांनी घ्यावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले आहे.

# एकाच दिवसात पालिकेच्या तिजोरीत ४ कोटी ६६ लाख जमा...

## १२ मालमत्तांवर अटकावणीची कारवाई...

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०६, पनवेल :** महापालिकेच्या वतीने थकबाकीदारांच्या मालमत्ता अटकावणी मोहीमेस जोमाने सुरूवात केली आहे. मार्च महिना सुरू झाल्यापासून मालमत्तांवर अटकावणीची कारवाई करण्यास वेग आला असून आजच्या एका दिवसात तब्बल मालमत्तांवर अटकावणी कारवाई करण्यात आली आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानूसार उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या मार्गदर्शनात महापालिकेच्यावतीने मालमत्ता कर न भरणाऱ्या थकबाकीदारांच्या विरोधात पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कर संकलन व कर आकारणी विभागाच्यावतीने तयार करण्यात आलेल्या विविध जप्ती व अटकावणी पथकाच्या माध्यमातून वेगाने कारवाई केली जात असून, दररोज कोटीच्या घरामध्ये मालमत्ता कर पालिकेच्या तिजोरीत जमा होत आहे. आयुक्तांनी दिलेल्या आदेशनूसार आज दिनांक ०६ मार्च रोजी मालमत्ता कर न भरणाऱ्या थकबाकीदारांवरती प्रत्येक विभागातील वसुली पथकाने कारवाई केली असून यामध्ये खारघर मधील भारती विद्यापीठ, प्राईम मॉल, द पॅसिफिक अपार्टमेंट, कळंबोली मधील बेस्ट रोडवेज कंपनी आणि तळोजामधील वेदान्त इंटरमिडीएट प्राइवेट लिमिटेड यांच्यासह १२ मालमत्तांवर अटकावणी कारवाई करण्यात आली आहे. कर अधिक्षक महेश गायकवाड तसेच कर अधिक्षक सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली जप्ती कारवाई व वसुली कारवाईसाठी मनुष्यबळ वाढविण्यात आले आहे. अटकावणी कारवाई अधिक तीव्र केल्यामुळे मालमत्ता कर भरण्याकडे मालमत्ताधारकांचा




कल वाढू लागला आहे. आजच्या एका दिवसात महापालिकेच्या तिजोरीत ४ कोटी ६६ लाखाची भर पडली आहे. तर या आर्थिक वर्षात एकुण ३४७ कोटी ८२ लाखाची वसुली करण्यात आली आहे.

'पीएमसी टॅक्स ॲप' मोबाईल ॲप विकसित केले आहे. तसेच www.panvelmc.org या वेबसाईटवरती जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास १८००-५३२०-३४० या टोल फ्री क्रमांवरती संपर्क साधावा. नागरिकांनी लवकरात लकवर आपला मालमत्ता कर भरून महापालिकेला सहकार्य करून जप्ती सारखी कटू कारवाई टाळावी असे आवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

# राष्ट्रीय स्तरावरील खेळांमध्ये पनवेल मनपा अग्निशमन जवानांचे घवघवीत यश

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०६, पनवेल :** त्यागराज स्टेडियम नवी दिल्ली येथे ऑल इंडिया नॅशनल फायर सर्व्हिस स्पोर्ट्स कंट्रोल बोर्डाच्या वतीने तिसऱ्या ऑल इंडिया इंडिया फायर सर्व्हिसेस स्पोर्ट्स अॅन्ड फायर सर्व्हिसेस मीट २०२५ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या विविध राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांमध्ये महापालिकेच्या अग्निशमन दलातील महिला व पुरूषांनी घवघवीत यश मिळवले आहे.



थाळीफेक व गोळा फेक या दोन्ही खेळामध्ये पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलातील महिला अग्निशामक शुभांगी घुले यांना सुवर्ण पदक प्राप्त झाले आहे. तसेच अग्निशामक आकाश नलवडे व तेजश्री साळुंखे यांनी बॅडमिंटन मिश्र दुहेरी प्रकारात कांस्य पदक पटकाविले आहे. व एकेरी बॅडमेंटन प्रकारात कास्य पदक पटकावले. अग्निशामक चंद्रकांत मणसे यांनी स्टेअर रेस फुल फायर फायटर स्पर्धांमध्ये (३५ मजली इमारती चढणे) कांस्य पदक मिळविले.

पैलवान प्रदिप सावंत यांनी कुस्तीच्या उपांत्य फेरीपर्यंत धडक मारली. याबरोबरच कृष्णा नरवटे व रामदास तिरवड यांनी अनुक्रमे २०० मीटर व १०० मीटर स्पर्धांमध्ये सहभाग घेतला.

महापालिकेच्या अग्निशामकांनी मिळवलेल्या घवघवीत यशाबद्दल आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते सर्व विजेत्या अग्निशामकांचा आज सत्कार करण्यात आला. आयुक्त मंगेश चितळे व उपायुक्त कैलास गावडे, मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे, अग्निशमन अधिकारी हरिदास सुर्यवंशी व सर्व अधिकारी वर्गाने त्यांचे अभिनंदन केले. तसेच पुढील होणाऱ्या स्पर्धकांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

पनवेल महापालिकेच्या वतीने अग्निशामकांची भरती झाल्यानंतर मिळालेले हे पहिले मोठे यश आहे.

# एआय आणि स्पेस टेकच्या एकत्रित वापरातून राज्याला पुढे घेवून जाणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, ठाणे :** येणारा काळ हा स्पेस टेकचा काळ असून एआय आणि स्पेस टेकचा एकत्रित वापर करून राज्याला दोन पावले पुढे घेवून जाणार, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला.

जिओस्पॅशल तंत्रज्ञान ग्रामपंचायत विकास आराखडा (जीपीडीपी) बनविण्यात अत्यंत प्रभावी ठरू शकते. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीतर्फे अनेक विषयांवरील कार्यशाळा आयोजित केल्या जातात. त्याअंतर्गत आज उत्तन येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि स्पेस टेक यांच्या संयुक्त विद्यमानाने स्पेस-टेक फॉर गुड गव्हर्नन्स ही राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते.

या परिषदेसाठी लेफ्टनंट जनरल विनोद खंडारे (निवृत्त), डॉ.प्रकाश चव्हाण, माजी राज्यसभा सदस्य तथा रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ.विनय सहस्त्रबुद्धे आदी मान्यवर उपस्थित होते.

स्पेस फॉर गुड गव्हर्नन्स कॉन्क्लेव्ह मध्ये उपग्रह प्रतिमा आणि भू-स्थानिक साधने यासारख्या अत्याधुनिक अवकाश तंत्रज्ञानाचा वापर ग्रामीण भारतातील आव्हानांना कसे तोंड देऊ शकतो, याचा शोध घेतला जातो. हा कार्यक्रम सरकार, उद्योग आणि तंत्रज्ञान संस्थांमधील आपापसातील समन्वय वाढ व सहकार्याला उपयुक्त ठरणार असून या माध्यमातून नवोपक्रमांना चालना मिळेल, सार्वजनिक सेवा मजबूत होतील आणि शाश्वत विकासाला पाठिंबा मिळेल.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, विविध क्षेत्रांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये स्पेस टेकचा वापर वाढलेला आहे. विविध उद्योगांमध्ये स्पेसटेकचे योगदान महत्त्वाचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पेस टेकचे महत्व जाणून पॉलिसी तयार केली. खासगी क्षेत्राचा यामध्ये कसा समावेश करता येईल, चांगले काम चालू राहील यासाठी स्पेस टेकचा उपयोग केला जात आहे. स्पेस स्टार्टअप १८९ स्टार्टअप दिसतात. रिमोट सोर्सिंग, ड्रोन जीपीएस यामध्ये स्पेस टेकचा वापर केला जातो. त्यामुळे कामकाजामध्ये पारदर्शकता दिसून येते. पंतप्रधान महोदयांनी गतिशक्ती प्लॅटफॉर्म तयार केले आहे. काही




वर्षांमध्ये होणारे काम स्पेस टेकचा वापर केल्यामुळे कमी दिवसांमध्ये पूर्ण होते. भविष्यात मॅन्युअल प्रोसेस बंद करून स्पेस टेक प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. यामुळे अडीच हजार कोटी रुपये वाचणार आहेत. जलयुक्त शिवार या योजनेमध्ये २० हजार गावांमध्ये स्पेस टेक तंत्रज्ञानाचा वापर करून पाण्याचे नियोजन केले. दरड कोसळणे, पूर, भूस्खलन, भूकंप यासारख्या आपत्ती येत राहतात, त्यावेळी आपत्ती व्यवस्थापन करणे, ही बाब अत्यंत महत्वाची असते. परंतु त्याचे योग्य पद्धतीने मॉनिटरिंग करून येणाऱ्या आपत्तीवर नियंत्रण मिळविण्यासाठी, होणाऱ्या हानीचे प्रमाण करण्यासाठी स्पेस टेकचा वापर केला जावू शकतो. आरोग्य शिक्षण या विभागातही स्पेस टेकचा वापर केला जातो. येत्या तीन महिन्यांमध्ये स्पेस टेक पॉलिसी तयार करण्यात येणार असून स्टार्टअप आणि इकोसिस्टम तयार करण्यात येणार आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या परिषदेतील उद्घाटन सत्रात रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक डॉ. जयंत कुलकर्णी यांनी प्रस्तावना केली. तर डॉ.विनय सहस्त्रबुद्धे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या संपूर्ण परिषदेचे सूत्रसंचालन गीता कुलकर्णी यांनी केले.

# थोडक्यात

## गुजरातमधील बोट अपघातात पालघरच्या ४ खलाशांचा मृत्यू

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०६ डहाणू (पालघर) :** पालघर जिल्ह्यातील तलासरी तालुक्यातील झाई गावातील चार खलाशी आणि गुजरात राज्यातील एक खलाशी यांचा बोट अपघातात बुडून मृत्यू झाला आहे. ही दुर्दैवी घटना ४ मार्च २०२५ रोजी घडली.

मृतांमध्ये झाई गावातील अक्षय प्रभू वाघात, अमित अशोक सुरूम, सुरज विलास वळवी, सूर्या अशोक शिंगडा आणि गुजरातमधील दिलीप बाबू सोळंकी रा. वनगबार, गुजरात यांचा समावेश आहे. हे सर्व खलाशी गुजरातमधील बोट मालक चुनीलाल देवा बारिया यांच्या निराली (DD-02-MM-757) या मासेमारी बोटीवर खलाशी म्हणून कामाला गेले होते. ही बोट १८ फेब्रुवारी २०२५ रोजी मासेमारीसाठी समुद्रात निघाली होती. मासेमारी करून परतत असताना ४ मार्च रोजी बोटीला अपघात झाला. या अपघातात पाच खलाशी बुडून मृत्युमुखी पडले. घटनेची माहिती घोलवड पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक साहेबराव कचरे यांनी दिली आहे. या दुर्घटनेमुळे झाई गावात शोककळा पसरली आहे.

## हदगाव आगारामध्ये सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाची कार्यकारणी ची निवड



**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.०६, हदगाव (नांदेड) :** हदगाव आगारांमध्ये आमदार गोपीचंद पडळकर साहेब प्रणित शेवा शक्ती एसटी कर्मचारी संघटनेची पदाधिकाऱ्यांची कार्यकारणी निवड झाली त्यामध्ये आगार आध्यक्ष म्हणून एम डी बोरकर (चालक) तर सचिव आर टी वानोळ (वाहक) महिला अध्यक्ष आर व्ही बारसे (मुंजाळ) मॅडम यांच्या नियुक्ती करण्यात आल्या या कार्यक्रमाला आगारातील अनेक कर्मचारी उपस्थित होते. तसेच सेवाशक्ती एसटी कर्मचारी संघाचे महाराष्ट्र सचिव सतीश मेटकरी आणि महिला सचिव राजे मॅडम उपस्थित होत्या. बैठकीमध्ये अनेक कर्मचाऱ्यांनी आपले प्रश्न अडचणी मेटकरी साहेबांना सांगितले. सर्व कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाला उत्तर देऊन लवकरच एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नावर सेवाशक्ती कर्मचारी संघ आक्रमकपणे प्रश्न अडचणी सरकार दरबारी मांडण्याचे मेटकरी यांनी **अक्षराज प्रतिनिधीशी** बोलताना सांगितले.

## दिव्याला स्वतंत्र पोलीस स्टेशन करा ठाकरे गटाची मागणी



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०६, दिवा (ठाणे) :** दिवा शहर ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत येत असून दिव्याची लोकसंख्या पाच लाखाच्या वर आहे. सुरक्षेच्या कारणास्तव येथे मुंब्रा पोलीस स्टेशन अंतर्गत दिवा चौकी असून सदर पोलीस स्टेशनला पंचवीस ते तीस लोकांचा अपुरा असा स्टाफ असल्यामुळे दिव्यात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. चरस, गांजा,हकीम यासारख्या व्यसनाला येथील तरुण मंडळी आधीन जाताना दिसत आहेत. महिलांच्या तक्रारी सुद्धा भरपूर प्रमाणात आहेत. चोरी, दरोडे यासारखे प्रकार दिव्यात सरसपणे होताना दिसत आहेत. पंचवीस हजार लोकसंख्येच्या मागे एक पोलीस अशी दैन्य अवस्था दिवा चौकीचे असून. दिव्यातील लोकांना ऋछख करायचे असल्यास त्यांना दहा किलोमीटर मुंब्रा पोलीस स्टेशन येथे जावे लागते. त्यामुळे येथील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. दिवावासी गेले कित्येक वर्ष दिवा पोलीस स्टेशन व्हावे म्हणून आम्ही वारंवार मागणी करत आहोत परंतु जागेचा अभाव सांगून ही मागणी वारंवार पुढे ढकलण्यात येत आहे. तरी आपण ठाणे महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकारी ठाणे यांच्या बरोबर चर्चा करून दिवा विभागातील सरकारी जागा आपण पोलीस स्टेशन साठी मागणी करावी. व तेथे तात्काळ दिव्यासाठी सुसज्ज असे पोलीस स्टेशन करावे असे आशियाचे पत्र कल्याण जिल्हा प्रमुख दीपेशजी म्हात्रे यांच्या नेतृत्वात दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांनी ठाणे पोलीस आयुक्तांना दिले. यावेळी उपजिल्हाप्रमुख राहुल भगत, विजय देसाई, शहर प्रमुख सचिन पाटील, प्रकाश तेलगोटे, विजय कदम, लहू चाळके, रवींद्र सुर्वे, कळवा शहर संघटिका कल्पना कवले, मुंब्रा शहर संघटिका शाहीन घडीआली, उपशहर प्रमुख अनिश कुरेशी आदी उपस्थित होते.

## जागतिक महिला दिनापासून उपडाकघर कार्यरत




**दि.०६, पुणे :** चऱ्होली परिसराचे वाढते विस्तारीकरण लक्षात घेऊन या भागासाठी नवीन उपडाकघर सुरू करण्याचा निर्णय टपाल कार्यालयाने घेतला आहे. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शनिवारी (८ मार्च) हे नवीन उपकार्यालय कार्यरत होत आहे. त्यामुळे चऱ्होली परिसराला आता ४११०८१ हा नवीन पिनकोड मिळाला आहे.

चऱ्होली परिसरातील पत्रव्यवहाराचे काम आतापर्यंत आळंदी देवाची टपाल कार्यालय येथे सुरू होते. त्यामुळे पत्रव्यहारामध्ये आळंदी प्रमाणेच चऱ्होलीसाठी देखील ४१२१०५ हा पिनकोड वापरला जात असे. मात्र, या भागातील वाढत्या वसाहती आणि कामाचा व्याप लक्षात घेऊन उपडाकघराला परवानगी मिळाली आहे, असे पुणे ग्रामीण विभागाचे अधीक्षक डाकघर बाळकृष्ण एरंडे यांनी सांगितले. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शनिवारी होत असलेल्या उपडाकघराच्या उद्घाटन कार्यक्रमाला आमदार महेश लांडगे, पिंपरी चिंचवडचे माजी महापौर नितीन काळजे, पुणे क्षेत्राचे पोस्टमास्टर जनरल रामचंद्र जायभाये, पुणे क्षेत्राच्या निदेशक सिमरन कौर उपस्थित राहणार आहेत. या वेळी टपाल खात्यातील विविध श्रेणीमधील महिलांचा सत्कार आणि मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये बचत खाते, सुकन्या समृद्धी योजना, मासिक प्राप्ती योजना, आवर्ती ठेव योजना, मुदत ठेव खाते अशा विविध योजनांबद्दल मार्गदर्शन करण्यात येणार आहे, असे एरंडे यांनी सांगितले.